# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिका ठराव क्र.२४१/वि.क्र.११२, दि.०२.०३.२०२२
**{समाज विकास विभाग}** दिव्यांग खेळाडू ज्यांनी क्रिडा स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले आहेत किंवा जे खेळाडू विविध क्रिडा स्पर्धाकरिता सहभाग नोंदवू इच्छितात अशा दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य करण्याकरिता संदर्भीय ठरावातील अनु क्र. ६(३) अन्वये अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे. तथापि, या अर्थसहाय्य योजनेत अधिक पारदर्शकता राहावी तसेच योजनेचा लाभ अधिकाधिक दिव्यांग खेळाडूंना स्पर्धेच्या विविध टप्यावर मिळावा या हेतूने सद्यास्थित प्रचलित ठरावात मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे सूचनेप्रमाणे सुधारणा करण्याचे निर्देश मा.अति.आयुक्त (शहर) यांनी दि. ०८.०२.२०२४ च्या बैठकीत दिले. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे सुधारित निकष अर्थसहाय्य देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.
योजना :- राज्य स्तरीय, राष्ट्रीय स्तरीय व आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा मध्ये भाग घेणाऱ्या दिव्यांग खेळाडूंना आर्थिक सहाय्य योजना.

**लाभ देण्यात येणाऱ्या स्पर्धा :-**

| | | |
|---|---|---|
| (१ऑलंपिक गेम्स | (६राष्ट्रकुल युवा स्पर्धा | (११शालेय आशियाई जागतिक स्पर्धा / |
| (२विश्व अंजिक्यपद स्पर्धा | (७एशियन चॅम्पियनशिप | (१२पॅरा ऑलंपिक स्पर्धा |
| (३एशियन गेम्स | (८युथ ऑलंपिक | (१३पॅरा एशियन स्पर्धा |
| (४राष्ट्रकुल स्पर्धा | (९ज्यु. विश्व अजिंक्य पद स्पर्धा | (१४ज्युनिअर एशियन चॅम्पियनशिप |
| (५एशियन कप | (१०वर्ल्ड कप | (१५परिशिष्ट अ अन्वये - |

**अनुदानाची रक्कम:-**

1. **सहभागासाठी आर्थिक सहाय्य :-**
   a. वरील अधिकृत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभागासाठी पात्र होणाऱ्या खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इत्यादीसाठी खर्च कमाल रु. १५,०००/- आर्थिक सहाय्य.
   b. वरील अधिकृत राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेमध्ये सहभागासाठी पात्र होणाऱ्या खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इत्यादीसाठी खर्च कमाल रु. २५,०००/- आर्थिक सहाय्य.
   c. वरील अधिकृत अंतरराष्ट्रीय स्तरीय स्पर्धेमध्ये सहभागासाठी पात्र होणाऱ्या खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इत्यादीसाठी खर्च कमाल रु. १,००,०००/- आर्थिक सहाय्य.

   (सदर अर्थसहाय्य क्रिडा प्रकार (वैयक्तिक/सांघीक) व स्पर्धा आयोजनाचे ठिकाण यावर अवलंबून राहील.)

2. **प्रशिक्षण, साहित्य खरेदी इ. आर्थिक सहाय्य :-**

वरील अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या/ झालेल्या खेळाडूंना कामगिरी लक्षात घेऊन फक्त एकाच वेळेस प्रशिक्षण, साहित्य खरेदी, मार्गदर्शक शुल्क इत्यादी साठी खालीलप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील :-

   a. ऑलंपिक स्पर्धा, विश्व अंजिक्यपद स्पर्धा, एशियन गेम्स, राष्ट्रकुल स्पर्धा, राष्ट्रकुल युवा स्पर्धा, एशियन चॅम्पियनशिप, युथ ऑलंपिक, ज्यु. विश्व अजिंक्य पद स्पर्धा, शालेय आशियाई / जागतिक स्पर्धा, पॅरा ऑलंपिक स्पर्धा, पॅरा एशियन स्पर्धा, एशियन कप, ज्युनिअर एशियन चॅम्पियनशिप या स्पर्धा मध्ये पात्र ठरलेल्या खेळाडूंना देश-विदेशातील प्रशिक्षण मार्गदर्शकाचे व क्रीडा साहित्य आयात करणे/खरेदी करणे करिता रु. 3.00 लक्ष प्रत्यक्ष व कमाल मर्यादा रहील.

(सदर खेळाडू राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त करीत राहील तोपर्यंत अर्थसहाय्य मिळण्यास पात्र राहील.)

3. एकच दिव्यांग खेळाडू विविध स्तरावर राज्यस्तरीय, राष्ट्रीय,अंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिडा स्पर्धेत प्राविण्य मिळवत असेल तसेच अंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत सहभाग घेत असेल त्या खेळाडूंना योजने अंतर्गत लाभ पुढिलप्रमाणे अनुज्ञेय राहील -
   - एका दिव्यांग खेळाडूनी राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेत या योजनेंतर्गत लाभ घेतला असेल आणि त्याला इतर स्तरीय स्पर्धेत (राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय स्तरावर) प्राविण्य, सहभाग घ्यावयाचा झाल्यास त्याला या योजनेंतर्गत अगोदर मिळालेला अर्थसहाय्य व देण्यात येणारा अर्थसहाय्य यातिल फरकाचा निधीचा लाभ अनुज्ञेय राहील.

**अटी व शर्ती :-**

1) कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान 5 वर्षे वास्तव्य असल्याबाबत पुरावा म्हणून मालमत्ताधारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याबाबतची पावती/निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ विजबिल/तीन वर्षाचा भाडे करारनामा/ रेशनकार्ड/ विवाह नोंदणी दाखला पुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)
2) आधारकार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट व व्हिसा सादर करणे बंधनकारक राहील.
3) अर्जासोबत दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र व UDID कार्ड जोडणे बंधनकारक राहील.त्याशिवाय योजनेचा लाभ देय राहणार नाही.
4) सदर खेळाडूंनी मागील तीन वर्षात कनिष्ठ/ वरिष्ठ/ राज्य/ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करून किमान एकदा पदक मिळविणे बंधनकारक राहील.
5) भारतीय शालेय खेल महासंघ अथवा अधिकृत भारतीय खेळ संघटना यांच्यावतीने अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धासाठी निवड झाल्याबाबत प्रमाणपत्र संबंधीत खेळाडूकडे असावे. निमंत्रीत स्वरूपाचा स्पर्धासाठी झालेली निवड पात्र ठरणार नाही.
6) खेळाडूने राष्ट्रीय स्पर्धेत नवीन विक्रम प्रस्थापित केला असेल असा अधिकृत स्पर्धेतील खेळाडू.
7) एखाद्या खाजगी/वैयक्तिकरित्या आयोजित केलेल्या किंवा आमंत्रित/निमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धामध्ये भाग घेवून मिळविलेल्या प्राविण्य प्रमाणपत्र तसेच सहभागाचा विचार केला जाणार नाही.
8) अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.
9) लाभ घेणाऱ्या अर्जदाराने इतर शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेत नसल्याचे तसेच केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या व नागपूर महानगरपालिकेच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून अर्थसहाय्य मिळत नसल्याचे हमीपत्र रु. 100/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.
10) अर्जासोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले असावेत.
11) या योजनेंतर्गत दिव्यांग खेळाडूंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्याच्या दोन महिण्या अगोदर विभागास अनुदानाकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील.जेणेकरून विभागास निकषाप्रमाणे अर्जदारास पात्र/अपात्र ठरविण्याची कार्यवाही करता येईल. अन्यथा स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर आर्थिक सहाय्य देण्यात येईल.
12) आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या दिव्यांग खेळाडूंना साहित्य खरेदी करिता अर्थसहाय्य साहित्य खरेदी केल्यानंतर GST देयक विभागास सादर केल्यावर व साहित्याचे छायाचित्र विभागास सादर केल्यानंतर करण्यात येईल.
13) सदर योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात वळते करण्यात येईल

14) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजूर करणे अथवा नाकारणेचा तसेच अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

राज्यस्तरीय, राष्ट्रीय,अंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिडा स्पर्धेत प्राविण्य मिळवणाऱ्या व क्रिडा स्पर्धा मध्ये भाग घेणाऱ्या घेणाऱ्या खेळाडूंना अर्थसहाय्य योजने करिता क्रिडा अधिकारी,मनपा हे नोडल अधिकारी असल्याने योजनेतील पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही क्रिडा अधिकारी ,मनपा द्वारे सर्व अटी व शर्ती यांचे अधीन राहून प्रस्तावित करतील.यानंतर समाज विकास विभागाद्वारे पात्र प्रस्तावाची सुकाणू समितीद्वारे मान्यता घेवून लाभ देण्याकरिता शिफारस मा.आयुक्त यांचेकडे करण्यात येईल.

सबब, उपरोक्त प्रस्तावित सुधारित निकषाच्या अधीन राहून योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता प्रस्तावास मान्यता प्रदान करणेबाबत.

टिप - १.सविस्तर माहिती नस्तीत संलग्न

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 66/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 13/06/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका ठराव क्र.२४१/वि.क्र.११२, दि.०२.०३.२०२२

दिव्यांग खेळाडू ज्यांनी क्रिडा स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले आहेत किंवा जे खेळाडू विविध क्रिडा स्पर्धाकरिता सहभाग नोंदवू इच्छितात अशा दिव्यांग खेळाडूंना अर्थसहाय्य करण्याकरिता संदर्भीय ठरावातील अनु क्र. ६(३) अन्वये अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे. तथापि, या अर्थसहाय्य योजनेत अधिक पारदर्शकता राहावी तसेच योजनेचा लाभ अधिकाधिक दिव्यांग खेळाडूंना स्पर्धेच्या विविध टप्यावर मिळावा या हेतूने सद्यास्थित प्रचलित ठरावात मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे सूचनेप्रमाणे सुधारणा करण्याचे निर्देश मा.अति.आयुक्त (शहर) यांनी दि. ०८.०२.२०२४ च्या बैठकीत दिले. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे सुधारित निकष अर्थसहाय्य देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

योजना :- राज्य स्तरीय, राष्ट्रीय स्तरीय व आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा मध्ये भाग घेणाऱ्या दिव्यांग खेळाडूंना आर्थिक सहाय्य योजना.

**लाभ देण्यात येणाऱ्या स्पर्धा :-**

| | | |
|---|---|---|
| (१ऑलंपिक गेम्स | (६राष्ट्रकुल युवा स्पर्धा | (११शालेय आशियाई जागतिक स्पर्धा / |
| (२विश्व अंजिक्यपद स्पर्धा | (७एशियन चॅम्पियनशिप | (१२पॅरा ऑलंपिक स्पर्धा |
| (३एशियन गेम्स | (८युथ ऑलंपिक | (१३पॅरा एशियन स्पर्धा |
| (४राष्ट्रकुल स्पर्धा | (९ज्यु. विश्व अजिंक्य पद स्पर्धा | (१४ज्युनिअर एशियन चॅम्पियनशिप |
| (५एशियन कप | (१०वर्ल्ड कप | (१५परिशिष्ट अ अन्वये - |

**अनुदानाची रक्कम:-**

1. **सहभागासाठी आर्थिक सहाय्य :-**
   a. वरील अधिकृत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभागासाठी पात्र होणाऱ्या खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इत्यादीसाठी खर्च कमाल रु. १५,०००/- आर्थिक सहाय्य.

b. वरील अधिकृत राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेमध्ये सहभागासाठी पात्र होणाऱ्या खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इत्यादीसाठी खर्च कमाल रु. २५,०००/- आर्थिक सहाय्य.

c. वरील अधिकृत अंतरराष्ट्रीय स्तरीय स्पर्धेमध्ये सहभागासाठी पात्र होणाऱ्या खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इत्यादीसाठी खर्च कमाल रु. १,००,०००/- आर्थिक सहाय्य.

(सदर अर्थसहाय्य क्रिडा प्रकार (वैयक्तिक/सांघीक) व स्पर्धा आयोजनाचे ठिकाण यावर अवलंबून राहील.)

2. **प्रशिक्षण, साहित्य खरेदी इ. आर्थिक सहाय्य :-**

वरील अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या/ झालेल्या खेळाडूंना कामगिरी लक्षात घेऊन फक्त एकाच वेळेस प्रशिक्षण, साहित्य खरेदी, मार्गदर्शक शुल्क इत्यादी साठी खालीलप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील :-

a. ऑलंपिक स्पर्धा, विश्व अंजिक्यपद स्पर्धा, एशियन गेम्स, राष्ट्रकुल स्पर्धा, राष्ट्रकुल युवा स्पर्धा, एशियन चॅम्पियनशिप, युथ ऑलंपिक, ज्यु. विश्व अजिंक्य पद स्पर्धा, शालेय आशियाई / जागतिक स्पर्धा, पॅरा ऑलंपिक स्पर्धा, पॅरा एशियन स्पर्धा, एशियन कप, ज्युनिअर एशियन चॅम्पियनशिप या स्पर्धा मध्ये पात्र ठरलेल्या खेळाडूंना देश-विदेशातील प्रशिक्षण मार्गदर्शकाचे व क्रीडा साहित्य आयात करणे/खरेदी करणे करिता रु. 3.00 लक्ष प्रत्यक्ष व कमाल मर्यादा रहील.

(सदर खेळाडू राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त करीत राहील तोपर्यंत अर्थसहाय्य मिळण्यास पात्र राहील.)

3. एकच दिव्यांग खेळाडू विविध स्तरावर राज्यस्तरीय, राष्ट्रीय,अंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिडा स्पर्धेत प्राविण्य मिळवत असेल तसेच अंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत सहभाग घेत असेल त्या खेळाडूंना योजने अंतर्गत लाभ पुढिलप्रमाणे अनुज्ञेय राहील -

- एका दिव्यांग खेळाडूनी राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेत या योजनेंतर्गत लाभ घेतला असेल आणि त्याला इतर स्तरीय स्पर्धेत (राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय स्तरावर) प्राविण्य, सहभाग घ्यावयाचा झाल्यास त्याला या योजनेंतर्गत अगोदर मिळालेला अर्थसहाय्य व देण्यात येणारा अर्थसहाय्य यातिल फरकाचा निधीचा लाभ अनुज्ञेय राहील.

**अटी व शर्ती :-**

1) कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान 5 वर्षे वास्तव्य असल्याबाबत पुरावा म्हणून मालमत्ताधारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याबाबतची पावती/निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ विजबिल/तीन वर्षाचा भाडे करारनामा/ रेशनकार्ड/ विवाह नोंदणी दाखला पुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)
2) आधारकार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट व व्हिसा सादर करणे बंधनकारक राहील.
3) अर्जासोबत दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र व UDID कार्ड जोडणे बंधनकारक राहील.त्याशिवाय योजनेचा लाभ देय राहणार नाही.
4) सदर खेळाडूंनी मागील तीन वर्षात कनिष्ठ/ वरिष्ठ/ राज्य/ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करून किमान एकदा पदक मिळविणे बंधनकारक राहील.
5) भारतीय शालेय खेल महासंघ अथवा अधिकृत भारतीय खेळ संघटना यांच्यावतीने अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धासाठी निवड झाल्याबाबत प्रमाणपत्र संबंधीत खेळाडूकडे असावे. निमंत्रीत स्वरूपाचा स्पर्धासाठी झालेली निवड पात्र ठरणार नाही.
6) खेळाडूने राष्ट्रीय स्पर्धेत नवीन विक्रम प्रस्थापित केला असेल असा अधिकृत स्पर्धेतील खेळाडू.
7) एखाद्या खाजगी/वैयक्तिकरित्या आयोजित केलेल्या किंवा आमंत्रित/निमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धामध्ये भाग घेवून मिळविलेल्या प्राविण्य प्रमाणपत्र तसेच सहभागाचा विचार केला जाणार नाही.

8) अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.

9) लाभ घेणाऱ्या अर्जदाराने इतर शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेत नसल्याचे तसेच केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या व नागपूर महानगरपालिकेच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून अर्थसहाय्य मिळत नसल्याचे हमीपत्र रु. 100/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.

10) अर्जासोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले असावेत.

11) या योजनेंतर्गत दिव्यांग खेळाडूंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्याच्या दोन महिण्या अगोदर विभागास अनुदानाकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील.जेणेकरून विभागास निकषाप्रमाणे अर्जदारास पात्र/अपात्र ठरविण्याची कार्यवाही करता येईल. अन्यथा स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

12) आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या दिव्यांग खेळाडूंना साहित्य खरेदी करिता अर्थसहाय्य साहित्य खरेदी केल्यानंतर GST देयक विभागास सादर केल्यावर व साहित्याचे छायाचित्र विभागास सादर केल्यानंतर करण्यात येईल.

13) सदर योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात वळते करण्यात येईल

14) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजूर करणे अथवा नाकारणेचा तसेच अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

राज्यस्तरीय, राष्ट्रीय,अंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिडा स्पर्धेत प्राविण्य मिळवणाऱ्या व क्रिडा स्पर्धा मध्ये भाग घेणाऱ्या घेणाऱ्या खेळाडूंना अर्थसहाय्य योजने करिता क्रिडा अधिकारी,मनपा हे नोडल अधिकारी असल्याने योजनेतील पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही क्रिडा अधिकारी ,मनपा द्वारे सर्व अटी व शर्ती यांचे अधीन राहून प्रस्तावित करतील.यानंतर समाज विकास विभागाद्वारे पात्र प्रस्तावाची सुकाणू समितीद्वारे मान्यता घेवून लाभ देण्याकरिता शिफारस मा.आयुक्त यांचेकडे करण्यात येईल.

सबब, उपरोक्त प्रस्तावित सुधारित निकषाच्या अधीन राहून योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.